# कल्याण महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, कल्याण.

मुख्य कार्यालयः शंकरराव चौक, महानगरपालिका मुख्यालय समोर, कल्याण (पश्चिम) ४२१३०१

**Gmail Add:** kalyandombivlitransport@gmail.com


**जा.क्र./कॅाmमपीएमाल/परि/मुका/** ८६

**दिनांक :-** २७/०८/२०२६

**प्रति,**

**जनसंपर्क अधिकारी,**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका,

कल्याण.

**विषय :-** **कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि. करीता सेवा निवृत्त अधिकारी ठोक मानधन, करार पधतीवर नेमणुकीबाबतची जाहिरात प्रसिध्द करणेबाबत....**

-----ooo-----

कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि. करीता सेवा निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवा निव्वळ एकत्रित ठोक मानधनावर करार पध्दतीने निवड करणेसाठी ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत असून त्याबाबत वृत्तपत्रात दयावयाची जाहिरात सोबत जोडण्यात येत आहे.

सदरची जाहिरात एक राज्य स्तरीय आणि एक जिल्हा स्तरीय मराठी वृत्तपत्रात शासकीय दराने कमीत कमी जागेत प्रसिध्द करणेत यावी.

(डॉ. विजयकुमार द्वासे)

**संचालक तथा सचिव**

कल्याण महानगर परिवहन महामंडळ

मर्यादित, कल्याण.

# कल्याण महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, कल्याण.

मुख्य कार्यालयः शंकरराव चौक, महानगरपालिका मुख्यालय समोर, कल्याण (पश्चिम) ४२१३०१
**Gmail Add:** kalyandombivlitransport@gmail.com

जा.क्र./केएमपीएमएल/परि/मुका/ ९९
दिनांक :- २७/०८/२०२६

## -: प्रवर्ग निहाय अर्हता,अनुभव, अटी व शर्ती:-

कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि. च्या विवक्षित कामांसाठी प्रदिर्घ अनुभव असलेले **सेवा-निवृत्त** अधिकाऱ्यांच्या सेवा निव्वळ ठोक मानधन तत्वावर "**करार पध्दतीने**" घेणेकामी **सेवा-निवृत्त** झालेल्या अधिकारी यांचेकडून खालील पदांकरिता दिनांक ०२/०९/२०२६ ते दिनांक ११/०९/२०२६ या कालावधीत अर्ज मागविणेत येत आहेत.

**करार पध्दतीने घेण्यात येणाऱ्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यांचा तपशील खालील प्रमाणे.**

### शैक्षणिक अर्हता व अनुभव तपशील

| अ. क्र. | अधिकारी पद | पद संख्या | सुधारीत शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | वाहतुक व्यवस्थापक | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>२) बेस्ट परिवहन उपक्रमामध्ये वाहतूक विभागात उप मुख्य वाहतूक व्यवस्थापक अथवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावर किंवा राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये वाहतूक विभागामध्ये विभाग नियंत्रक किंवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावर किमान ०३ वर्षाच्या अनुभवासह सेवा निवृत्त झालेले उमेदवार.<br>३) व्यवसाय व्यवस्थापनातील पदवी/पदविका धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल. |
| २ | प्रशासकीय अधिकारी | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी.<br>२) शासकीय/निमशासकीय विभागातून प्रशासकीय विभाग /कर्मचारी वर्ग विभाग/ मनुष्यबळ विभाग या विभागामध्ये प्रशासकीय अधिकारी (Administrative Officer)/कर्मचारी वर्ग अधिकारी ( Personnel Officer) या पदावर किंवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावर किमान ०३ वर्षाच्या अनुभवासह सेवा निवृत्त झालेले उमेद्वार. या उमेद्वारांकडे भरती/बढती/बदली/कर्मचारी औद्योगिक संबंध, शासकीय आरक्षण तरतुदीं, आकृतीबंध, संस्था संरचना, कामगार कायदे व कामगारांच्या तक्रारी/करार याबाबतचे सर्वांगिण ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| ४ | लेखाधिकारी (वरिष्ठ) | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>२) शासकीय/निमशासकीय विभागातून वित्त व लेखा विभागांमध्ये मुख्य वित्त व लेखाधिकारी या पदावर किमान ०३ वर्षाच्या अनुभवासह सेवा निवृत्त झालेले उमेद्वार. |

